PDF Complete
Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

# कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी उपस्थितांची आदरांजली

वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे दि. ०६ डिसेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे आयोजन प्रा. अंजली गहरवार यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हारार्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी त्यांच्या स्मृती पित्यर्थ त्यांना अभिप्रेत असलेले समता, व्यक्तीस्वातंत्र, विचारस्वातंत्र व न्याय तत्वांचा प्राध्यापकांच्या मार्गदर्शनातून उहापोह करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील महीलासाठी हिंदु कोड बील संसदेत सादर केले होते. बाबासाहेबांनी दामोधर प्रकल्प योजना, मजुर वर्ग, कामगार श्रमिक व शेतकऱ्याकरिता कार्य केले. त्यांनी पैशाची समस्या हा प्रबंध लिहून भारताला स्वातंत्र कीती आवश्यक आहे हे सांगितले, त्यांनी अथक परिश्रमाने स्वत: अनेक राज्यघटनेचा अभ्यास करून भारताला एक महान राज्यघटना दिली. त्यामध्ये त्यांनी देशाच्या अखंडतेला व एकात्मतेला कुठेही छेद होणार नाही याची काळजी घेतली होती. बाबासाहेबांनी त्यांच्या लिखानातून देशाला मौलिक विचार दिले. त्यांच्या कार्याची व विचारांची उजळणी प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या मार्फत करण्यात आली.

या वेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. प्रशांत सिंगाटे यांनी केले. कार्यक्रमांला वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्रा. अंजली गहरवार, प्रा. धिरज वसुले, मंगेश शेटे, सहायक कुलसचिव, डॉ. रविंद्र सातभाई, डॉ. प्रशांत सिंगोटे, डॉ. संदेश बांगर, प्रा. हेमंत वाघ, डॉ. रोशन शिंदे, श्री रूपेश राऊत, श्री. पंकज जैन, एकनाथ भंकाळे, दिपाली शिंदे, भारती मेश्राम, अस्मिता पाटील, प्रविण डोंगरे, शुभम धार्मिक, रेखा ठाकरे, तसेच महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थीत होते.